# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरारयांचेकार्यालय**

**रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**

**दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१**

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्रमांक - १११/२०२५** **दिनांक ०६/०३/२०२५**

## प्रेसनोट

**अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या महिला आरोपीस अटक करुन दोन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश**

---------------------

वसंतनगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर येथे एक महिला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच तसेच असे सदर ठिकाणी जावुन दि. ०५/०३/२०२५ रोजी कारवाई करुन महिला वेश्यादलाल वैजयंती सुरेश वाघचौरे वय ३३ वर्षे रा. कुलाबा ,कफ परेड, झोपडपट्टी मुंबई मुळ रा. पाथर्डी जि. अहमदनगर हिस अटक करुन दोन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल याचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे महिला वेश्यादलाल वैजयंती वाघचौरे हिचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता तिने सांगितले की, मी एका मुलीचे ६,२००/- रु. घेते व बोगस गि-हाईक याने तिन मुली पाहीजे आहे असे सांगीतले असता महिला वेश्यादलाल वैजयंती वाघचौर हीने तिघींचे १८,६००/- रु. होतील असे सांगुन आपणास कबुल असेल तर नालासोपारा पुर्व,वसंत नगरी येथे येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह वर नमुद ठिकाणी गेले असता वेश्यादलाल वैजयंती सुरेश वाघचौरे हिने बोगस गिऱ्हाईकास दोन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महिला दलाल आरोपीत नामे वैजयंती सुरेश वाघचौरे वय ३३ वर्षे हिस ताब्यात घेतले. व दोन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे वैजयंती सुरेश वाघचौरे वय ३३ वर्षे रा. कुलाबा ,कफ परेड, झोपडपट्टी मुंबई मुळ रा. पाथर्डी जि. अहमदनगर हिने पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ६२००/-रु. घेते व त्यातील ४०००/- रुपये पिडीत महीलांना देत असते.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करून नमूद महिला दलाल हिस अटक करून आचोळे पोलीस ठाणे गु.रजि.नं.७७/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३ (२) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे महिला आरोपीत वैजयंती सुरेश वाघचौरे वय ३३ वर्षे हिचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार, व सफौ/गवई, पोहवा/महेंद्र शेटये, मपोहवा/०८००३ तिवले, पोहवा/श्याम शिंदे, चालक पोहवा/सुनिल पागी, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

-------------------oo--------------------